# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक-९ जुलै २०१७

- **ब्रीक्स युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये मुंबई विद्यापीठाची आघाडी**
- **मुंबई विद्यापीठ महाराष्ट्रात अव्वल स्थानावर**
- **ब्रीक्सच्या सर्वोत्तम शिक्षण संस्थांच्या यादीत मुंबई विद्यापीठ**

मुंबई – ब्रीक्स देशातील सर्वोत्तम विद्यापीठांच्या यादीत मुंबई विद्यापीठाची मोहोर उमटली आहे.पहिल्या शंभरामध्ये मुंबई विद्यापीठाला स्थान मिळाले असून , मुंबई विद्यापीठ हे ७८ व्या स्थानावर पोहचले आहे. ब्रीक्स देशातील ( भारत,चीन,रशिया ,दक्षिण आफ्रिका आणि ब्राझील) सर्वोत्तम शिक्षणसंस्थांच्या २०१७ च्या क्रमवारीत मुंबई विद्यापीठाने बाजी मारली आहे.
ब्रीक्स देशातील विद्यापीठाच्या रँकींगमध्ये गतवर्षीच्या तुलनेत ६८ या स्थानावरुन ७८ या स्थानावर मुंबई विद्यापीठ पोहचले आहे.देशातील पारंपरिक ४ विद्यापीठापैकी मुंबई विद्यापीठ तिस-या क्रमांकावर पोहचले आहे,तर महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये मुंबई विद्यापीठ अव्वल स्थानावर आहे.
ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे आणि देशाची ज्ञानविषयक गौरवशाली परंपरा आणि वाढता सामाजिक-आर्थिक प्रभाव पाहता मुंबई विद्यापीठाने ज्ञानदानाच्या या पवित्र कार्यात आपला मोलाचा ठसा उमटवला आहे.
क्वाकारेली सायमंड Quacquarelli Symonds (QS) यांनी प्रसिद्ध केलेल्या ब्रीक्स देशातील विद्यापीठांच्या क्रमवारीत पहिल्या दीडशेमध्ये भारतातील पारंपरिक विद्यापीठामध्ये मुंबई विद्यापीठाचा समावेश झाला असून महाराष्ट्रात अव्वल स्थान टिकवून ठेवले आहे.

क्यूएस च्या अहवालानुसार,मुंबई विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात भरीव कामगिरी केली आहे.मुंबई विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सामंजस्य करार करत अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत.खेळ आणि सांस्कृतिक क्षेत्रातही मुंबई विद्यापीठाची कामगिरी अतुलनिय आहे.गेल्या पाच वर्षात विद्यापीठात १०४ टक्क्यानी पदवी आणि ११२ टक्क्यांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.तर दुरस्थ शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येत १४७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.एवढच नाही आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या जर्नल्स मध्ये १७६ टक्क्यांनी संशोधन पेपर्स मध्ये वाढ झाल्याचे नमुद करण्यात आले आहे.विद्यापीठाच्या १२ विभागांना अनेक राष्ट्रीय स्तरावच्या कार्यक्रमात मान्यता मिळाल्याचेही नमुद करण्यात आले आहे.विद्यापीठाशी सलंग्नित असलेले ८० हून अधिक प्राध्यापक हे विविध व्यावसायिक कार्यकारणीवर कार्यरत आहेत. तर गेल्या पाच वर्षात १८ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने येथील प्राध्यापकांना गौरन्वित करण्यात आल्याचेही अहवालात सांगण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठांने समाजाचे बौध्दिक आणि नैतिक शक्तीस्थान म्हणून गेल्या १५७ वर्षांत भरीव कामगिरी केली आहे.सामाजिक मुल्य आणि संधींची सतत वाढणारी जबाबदारी उत्साहाने वागवत

देशाला विशेषत: महाराष्ट्र आणि मुंबई शहराला उत्तम गुणवत्ता दिली आहे. मुंबई विद्यापीठाच्या ७४० सलंग्नित महाविद्यालयातून जवळपास  सात लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यवसायाभिमूख शिक्षणाची कास धरणा-या मुंबई विद्यापीठांने व्यवसायाभिमूख अभ्यासक्रम,नाविण्यपूर्ण शिक्षणक्रम,समाज महाविद्यालय,आदर्श महाविद्यालये सुरु केले आहेत.तर विद्यापीठाच्या उपकेंद्रामध्ये रोजगाराभिमूख अभ्यासक्रमाबरोबरच पाच वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत.सिंधुदुर्ग,रत्नागिरी,रायगड,ठाणे,मुंबई,आणि मुंबई उपनगर या ठिकाणी मुंबई विद्यापीठामार्फत विविध शिक्षणक्रम चालविले जातात.

## मुंबई विद्यापीठाची रॅंकींग

| | **स्कोर** | **रॅंक** |
|---|---|---|
| ब्रीक्स रॅंकीग 2015 | 63.10 | 58 |
| **आकडेवारी** | **स्कोर** | **रॅंक** |
| ब्रीक्स रॅंकीग 2015 | 63.1 | 58 |
| ब्रीक्स रॅंकीग 2014 | 54.4 | 68 |
| ब्रीक्स रॅंकीग 2013 | 55.3 | 62 |

सर्वेक्षण आकडेवारी

| | **स्कोर** | |
|---|---|---|
| एकेडेमिक रेप्यूटेशन | 61.50 | 69 |
| एम्प्लॉयर रेप्युटेशन | 93.80 | 18 |
| सायटेशन पर पेपर | 87.60 | 46 |
| पेपर पर फॅकल्टी | 99.90 | 3 |
| फॅकल्टी स्टाफ वीथ पीएचडी | 100.00 | 23 |

### कोट

(“विद्यापीठातील माझ्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संशोधन आणि विकासाच्या प्रक्रियेत केलेल्या विशेष आणि साश्वत प्रयत्नांची ही फळनिश्पती आहे, याच विकासाची कास धरणारे मुंबई विद्यापीठ हे समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्नशील असणार आहे.”- डॉ.संजय देशमुख,मा.कुलगुरु,मुंबई विद्यापीठ)

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)